www.pudhari.com
स्थापना १९३९
७५
अमृतमहोत्सवी दैनिक
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
मुंबई
बुधवार, १८ नोव्हेंबर २०१५ । स्थापना वर्ष ७६ । मुंबई आवृत्ती वर्ष ७ वे । मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, सोलापूर, बेळगा

# फेफरे येणाऱ्या रुग्णांच्या मदतीसाठी मोबाईल अॅप

मुंबई : प्रतिनिधी

रस्त्यामध्ये, ट्रेन, बस, समारंभामध्ये अचानक एखाद्या व्यक्तीला फेफरे किंवा आकडी आल्याने आसपासच्या लोकांची तारांबळ उडते. या व्यक्तीला चप्पल किंवा कांद्याचा वास देऊन शुद्धीवर आणले जाते. मात्र अनेकदा अशा व्यक्तीला दुखापत झाल्यास तिला रुग्णालयात नेताना तिच्या घरच्यांशी संपर्क करताना अडचणी येतात. त्यामुळे अशा व्यक्तींच्या मदतीसाठी बॉम्बे हॉस्पिटल आणि एपिलेप्सी फाऊंडेशनने मोबाईल अॅप तयार केले आहे. या अॅपचे उद्घाटन मंगळवारी पद्मविभूषण, प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ व बॉम्बे रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. बी. के. गोयल यांच्या हस्ते करण्यात आले.

भारतामध्ये फेफरे म्हणजेच एपिलेप्सीने ११.२ दशलक्ष लोक ग्रस्त असून, महाराष्ट्रामध्ये हाच आकडा २.५ लाख इतका आहे. तर मुंबईमध्ये सुमारे ७० हजार लोक या आजाराने त्रस्त आहेत. फेफरे हे नियमित येत नसल्याने सुमारे १५ ते २० टक्के रुग्ण हे नेहमीच मानसिक तणावाखाली वावरत असतात. तसेच या रुग्णांकडून औषधे घेण्यासाठी वारंवार टाळाटाळ

## बॉम्बे हॉस्पिटल व एपिलेप्सी फाऊंडेशनने केले तयार

केली जाते. फेफऱ्यांबाबत अनिश्चितता असल्याने रुग्णांच्या मनात नेहमी भीती असते. याचा परिणाम त्यांच्या सामाजिक आयुष्यावर होत असतो. ही बाब लक्षात घेऊन हा अॅप रुग्णांसाठी आणण्यात आला आहे.

फेफरे आलेल्या व्यक्तीचा हातातील मोबाईल काही सेकंद सतत कंप पावल्यास मोबाईलमधील हे अॅप कार्यरत होऊन त्या व्यक्तीच्या जवळच्या नातेवाईकांना व डॉक्टरांना संदेश पाठवेल. त्यामुळे फेफरे आलेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना याची माहिती मिळून ते तातडीने दूरध्वनी करतील. जेणेकरून त्याला मदत मिळणे सहज सोपे होईल. हा मोबाईल अॅप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध असून, मोफत डाऊनलोड करता येईल, अशी माहिती एपिलेप्सी फाऊंडेशनचे संस्थापक डॉ. निर्मल सूर्या यांनी दिली. फेफरे हा आजार बरा होत नाही असे म्हटले जाते पण त्यावर सलग किमान दोन वर्षे न चुकता औषध घेतल्यास हा आजार पूर्णतः बरा होतो. त्याचप्रमाणे फेफरे येणाऱ्या व्यक्तीला कांदा किंवा चप्पलचा वास देणे चुकीचे आहे.



### मोबाईल अॅपची वैशिष्ट्ये

- रुग्णाची वैद्यकीय माहिती या अॅपमध्ये नोंदवता येते.
- फेफरे आल्यानंतर हातातील मोबाईल काही सेकंद सतत हलला तर रुग्णाला आकडी आल्याची नोंद करून त्याची माहिती तातडीने डॉक्टर व नातेवाईकांना मेसेजद्वारे कळवेल.
- फेफऱ्यांवर करण्यात येणाऱ्या उपचारांसदर्भातील माहिती, औषधांची माहिती व औषधांच्या दुष्परिणामांची माहिती रुग्णाला मिळेल.
- रुग्णाला औषधे वेळेत घ्यावी याबाबत रिमांइडर.
- डॉक्टरांची वेळ घेण्यासाठी व भेटण्याची आठवण करून देईल.

२ लोकमत पुणे, सोमवार, दि. १५ जून २०१५

मोफत उपचार मिळणार : सरकारकडून औंध जिल्हा रुग्णालयात विभागीय केंद्र सुरु

# राज्यातील इपिलेप्सी क्लिनिक पुण्यात

पुणे : इपिलेप्सी म्हणजेच फिट, मिरगी आदी आजार असलेल्या रुग्णांना एकाच छताखाली सर्व तपासण्या व उपचार मोफत मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने औंध जिल्हा रुग्णालयात विभागीय इपिलेप्सी क्लिनिक सुरु केले. हे राज्यातील पहिले क्लिनिक आहे.

देशासह राज्यात इपिलेप्सी आजाराचे रुग्ण वेगाने वाढत आहेत. मात्र, त्या तुलनेत त्यांना शासकीय स्तरावर सर्वंकष उपचार एकाच ठिकाणी मिळत नाहीत. खासगी रुग्णालयात या रुग्णांवर उपचार केले जातात. मात्र, त्यासाठी खूप खर्च येत असल्याने गरीब रुग्णांना तो परवडत नाही. त्यामुळे या आजाराबाबत आणि त्याच्या उपचाराबाबत जनजागृती न झाल्याने आजही गरीब रुग्ण या उपचारांपासून दूर आहेत. हे ओळखून त्यांना सर्वंकष मोफत उपचार एकाच ठिकाणी मिळावेत यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला आहे.

औंध येथे सुरु करण्यात आलेल्या पहिल्या रिजनल इपिलेप्सी क्लिनिकचे उद्घाटन राज्य आरोग्य विभागाच्या पुणे मंडळाचे उपसंचालक डॉ. हनुमंत चव्हाण, इपिलेप्सी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. निर्मल सूर्या, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एस. एस. साठे आदी या वेळी उपस्थित होते.

यानिमित्ताने राज्य आरोग्य विभाग आणि इपिलेप्सी फाउंडेशनच्या वतीने औंध रुग्णालयात आज मोफत सिटीस्कॅन, एमआरआय आदी तपासण्या मोफत करण्यात आल्या. १४ न्यूरोलॉजिस्ट व न्यूरोसर्जनसह ५० जणांच्या वैद्यकीय पथकाकडून रुग्णांवर या तपासण्या व उपचार करण्यात आले.

या आजाराच्या जनजागृतीसाठी सूर्या फाउंडेशनच्या वतीने शहरात ५

## वर्षअखेरीपर्यंत पाच विभागांमध्ये क्लिनिक

- पुण्यात पहिले रिजनल इपिलेप्सी क्लिनिक सुरु करण्यात आल्यानंतर या वर्षअखेरीपर्यंत राज्यातील ५ विभागांमध्ये रिजनल इपिलेप्सी क्लिनिक सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे रुग्णांना त्यांच्या विभागातच या आजारावरचे उपचार मिळतील. या क्लिनिकमध्ये त्या भागातील तज्ज्ञ न्युरोफिजीशीयन मोफत रुग्णांची तपासणी करणार आहेत आणि शासनाकडून त्यांना मोफत औषधेही मिळतील. त्यामुळे रुग्णांना आता उपचारासाठी दुसरीकडे जावे लागणार नाही, अशी माहिती डॉ. सूर्या यांनी दिली.

### शंभर डॉक्टरांना प्रशिक्षण

- राज्यात इपिलेप्सी क्लिनिक सुरु करण्याच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाच्या राज्यभरातील शंभर डॉक्टरांसाठी इपिलेप्सी कार्यशाळेचे शनिवारी आयोजन करण्यात आले होते. यामध्ये डॉक्टरांना प्रशिक्षण देण्यात आले. न्यूरोफिजिशियन डॉ. प्रदीप दिवटे, डॉ. वाडिया, डॉ. हेमंत संत, डॉ. राहुल कुलकर्णी आदींनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

### रुग्णांवर ऑनलाईन लक्ष ठेवणार

"या इपिलेप्सी क्लिनिकमध्ये येणाऱ्या प्रत्येक रुग्णाची माहिती ऑनलाईनवर टाकण्यात येणार आहे. रुग्ण एकदा तपासणीसाठी आला, की त्याची माहिती ऑनलाईन करण्यात येणार आहे. त्यानंतर पुढच्या तपासणीसाठी रुग्ण आला नाही, तर त्याला फोन करुन बोलवून घेतले जाईल. रुग्णाने मध्येच औषधे सोडू नयेत म्हणूनही या ऑनलाईन प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे.

- डॉ. निर्मल सूर्या,
अध्यक्ष, इपिलेप्सी फाउंडेशन

### डोक्याच्या गंभीर दुखापतींमुळे इपिलेप्सीची लागण

इपिलेप्सी आजार होणाऱ्या रुग्णांपैकी ५० टक्के रुग्णांच्या डोक्यांना गंभीर दुखापत झालेली असते. यामध्ये हेल्मेट न घातला गाडी चालवत असताना अपघात होऊन झालेल्या गंभीर दुखापतींचे प्रमाण ५० टक्के आहे. त्यापाठोपाठ भाजीपाला चांगल्या पद्धतीने न धुता तो सतत खाण्यात आल्याने डोक्यात किडे होतात. आजार होण्याचे हे दुसरे मोठे कारण आहे, अशी माहिती डॉ. सूर्या यांनी दिली.

